# मुख्य वनसंरक्षक, कार्य आयोजना, नागपूर यांचे कार्यालय.

शासकीय मुद्रणालयाजवळ,सिव्हील लाईन्स, नागपूर 01

गोपनीय

विषय : नागपूर वनविभागातील मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे करण्यात आलेल्या कामाचे तपासणी बाबत.

कमांक : मुवसं / काआना / वपअ / 163 / 2012.13.

नागपूर, दिनांक : 16 / 05 / 2012

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),

नागपूर.

संदर्भ :- उप वनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर यांचे कडील पत्र क. कक्ष–02 / खर्च / प्र.क्र.41 / 11.12 / 247, दिनांक 19 / 04 / 2012.

संदर्भीय पत्रान्वये उप वनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर यांचेकडून या कार्यालयास प्राप्त झालेल्या वर्ष 2011–12 मध्ये नागपूर वनविभागात मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे केलेल्या कामाच्या तपशीलावरुन कुही वनपरीक्षेत्रात करण्यात आलेल्या क्षेत्रीय कामांची तपासणी निम्न स्वाक्षरीकर्ते यांनी दिनांक 15 / 05 / 2012 रोजी वनपरीक्षेत्र अधिकारी, कुही व त्यांचे अधिनस्त क्षेत्रीय कर्मचारी यांचे समवेत केली असता, सदर कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे करण्यात आले नसून त्यामध्ये खालीलप्रमाणे गंभीर स्वरुपाच्या अनियमीतता आढळून आल्या आहेत.

| अ.क्र. | कामाचा प्रकार | वर्कींग सर्कल | फेलींग सेरीज | कक्ष कमांक | कूप कमांक | एकूण क्षेत्र | कामाचे क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | CBO | IWC | धामना | 449 | VII | 137.160 | 22.17 | सदर कुपाची मोका तपासणी केली असता, सदर कुपात CBO ची कामे अजिबात करण्यात आली नाहीत. परंतू सदर कामाचे मोजमाप पुस्तकामध्ये दिनांक 16 / 03 / 2012 ते 25 / 03 / 2012 या कालावधीत सदर कामे करून घेण्यात आल्याची नोंद असून त्यावर रू. 29275 / – खर्च करण्यात आले आहेत. त्यामुळे मौक्यावर कोणतेही काम करण्यात आलेले नसल्याने सदर अनियीमत रक्कम खर्च करण्यास जबाबदार असलेले संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांचेकडून वसूल करून त्यांचेवर |

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय

(2)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | नियमाप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणे आवश्यक आहे. |
| 2. | NR | JWC | धामना | 449 | VIII | 134.94 | 1.85 | सदर कुप क्रमांक VIII ची मोका तपासणी केली असता, सदर कुपात नैसर्गिक पुर्नउत्पत्ती (NR) ची कामे करण्यात आली नाहीत. परंतू सदर कामाकरीता तयार केलेले मोजमाप पुस्तकामध्ये दिनांक 22/03/2012 ते 30/03/2012 या कालावधीत सदर कामे करण्यात आल्याची नोंद असून त्यावर रू 10675/- चा खर्च दाखविण्यात आला असून एकूण 1875 झाडांचे संगोपन केल्याचे दाखविण्यात आले आहे. त्यामुळे मौक्यावर कोणतेही काम झाले नसल्याने सदर रक्कम संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वसूल करुन त्यांना सदर अनियमिततेस जबाबदार धरून त्यांचेवर नियमाप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणे आवश्यक आहे. |
| 3. | Cleaning Works | SCI | धामना | 362 | III | 106.83 | 71.25 | सदर कुपात कोणत्याही प्रकारचे Cleaning ची कामे मौक्यावर करण्यात आले नसल्याने सदर कामावर खर्च केलेले रू. 118955/- अनियीमत असल्याने सदर रक्कम संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वसूल करुन त्यांचेवर जबाबदारी निश्चीत होवून नियमाप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणे आवश्यक आहे. |
| 4. | Old Teak Plantation | OTP | चाकेघाट | 444 | 1996 | 50.00 | 47.63 | नागपूर वनविभागाचे मंजूर कार्य आयोजनेमधील OTPWC मध्ये वर्ष 2011-12 मध्ये Cleaning ची कामे प्रस्तावित नसताना सुध्दा, तसेच सदर काम मौक्यावर प्रत्यक्षात केले नसताना सुध्दा, सदर रोपवनात Cleaning च्या कामावर रू. 83862/- खर्च टाकण्यात आला आहे. |

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | त्यामुळे सदर खर्च अनियीमत असून सदर रक्कम संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वसूल करुन त्यांचेवर जबाबदारी निश्चीत होवून नियमाप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणे आवश्यक आहे. |

2.00 वरील प्रमाणे कुही वनपरीक्षेत्रात वर्ष 2011–12 मध्ये मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे कामे न करता तसेच मोकयावर प्रत्यक्षात कामे न करता रक्कम खर्च करण्यात आली असून शासकीय रकमेचा अपहार करण्यात आल्याचे स्पष्ट दिसून येत आहे त्यामुळे सदर वित्तीय अनियमीततेस जबाबदार असलेले अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चीत होवून त्यांचेवर नियमाप्रमाणे आवश्यक कार्यवाही होणे आवश्यक असून सदर अनियीमत खर्च त्यांचेकडून वसूल होणे आवश्यक आहे. याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही आपले स्तरावर करण्यात यावी, ही विनंती.

3.00 याबाबत नागपूर वनविभागाची मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे वर्ष 2011–12 मध्ये केलेले कामाबाबत सुधारीत अहवाल उपवनसंरक्षक, नागपूर यांचेकडून या कार्यालयाचे पत्र क्रमांक मुवसं/काआना/रेंस/70 दिनांक 20/04/2012 व समक्ष क्रमांक 159 दिनांक 14/05/2012 अन्वये मागविण्यात आले असून ते अजुनपर्यंत या कार्यालयास अप्राप्त आहे. सदर अहवाल या कार्यालयास सादर करण्याबाबत आपलेमार्फत उपवनसंरक्षक, नागपूर यांना आवश्यक सूचना देण्यात यावी, ही विनंती.

मुख्य वनसंरक्षक,
कार्य आयोजना, नागपूर.

प्रतिलीपी : प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), म. रा. नागपूर यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रतिलीपी : अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्यआयोजना–पुर्व), नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सविनय सादर.

प्रतिलीपी : उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर यांना संदर्भीय पत्राचे अनुषंगाने माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय

मुख्य वनसंरक्षक,
कार्य आयोजना, नागपूर